पूर्णा गारमेंट सहकारी संस्था मर्या., बसमत, जि. हिंगोली या संस्थेच्या जागा बदलास व त्यावरील इमारत खरेदीस मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. यंत्रमाग- २००९/प्र.क्र.५७/टेक्स-२
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:- यंत्रमाग-१३९८/प्र.क्र.१५८/टेक्स-२, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:- यंत्रमाग-१३०६/प्र.क्र.१४१/टेक्स-२, दिनांक २२ जानेवारी, २००९.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:- यंत्रमाग-२००९/प्र.क्र.५७/टेक्स-२, दिनांक २९ मार्च, २०१६.
४) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्रमांक:-कार्या-४/ यंत्रमाग/पूर्णा गारमेंट/९८३२/२०१६, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६.
५) राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र क्रमांक:- एनसीडीसी ५-२/ २००९-एचएलएम (पीएल), दिनांक २६ जुलै, २०१७.

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पूर्णा गारमेंट सहकारी संस्था मर्या., बसमत, जि. हिंगोली या संस्थेस शासकीय भागभांडवल व रा.स.वि.नि. कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. सदर संस्थेने रक्कम वितरीत करतेवेळी पूर्णा ग्लोबल टेक्स्टाईल पार्क लि., यांचेकडील प्लॉट क्र. २ (क्षेत्र २०६६.९७ चौ.मी.) ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर घेतल्याबाबतची माहिती सादर केली होती. आता वाचा क्र. ४ अन्वये संचालक (वस्त्रोद्याग) यांनी सदर संस्थेने गारमेंट प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने पूर्णा ग्लोबल टेक्स्टाईल पार्क लि., यांचेकडील प्लॉट क्र. ४० (क्षेत्र १८२४.९८ चौ.मी.) मध्ये तयार असलेली इमारत खरेदी करण्यास मान्यता देण्याची विनंती केलेली होती. त्यास अनुसरून वाचा क्र. ५ अन्वये राष्ट्रीय सहकारी विकास निगमने सदर संस्थेस इमारत खरेदी करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुषंगाने पूर्णा गारमेंट सहकारी संस्था मर्या., बसमत, जि. हिंगोली या संस्थेच्या जागा बदलास व त्यावरील इमारत खरेदीस मंजुरी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पूर्णा गारमेंट सहकारी संस्था मर्या., बसमत, जि. हिंगोली या संस्थेस पूर्णा ग्लोबल टेक्स्टाईल पार्क लि., यांचेकडील प्लॉट क्र. २ (क्षेत्र २०६६.९७ चौ.मी.) ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर घेतलेल्या जागेवर गारमेंट प्रकल्प उभारणीस मान्यता देण्यात आलेली होती. आता सदर संस्थेस गारमेंट प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने पूर्णा ग्लोबल टेक्स्टाईल पार्क लि., यांचेकडील प्लॉट क्र. ४० (क्षेत्र १८२४.९८ चौ.मी.) मधील खरेदी केलेली जागा व इमारतीमध्ये प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. संबंधित संस्थेकडुन सदर खरेदी केलेल्या जमिनीवरच संस्थेस वितरीत करण्यात आलेला निधी खर्च होईल याची दक्षता संचालक (वस्त्रोद्योग) यांनी घ्यावी.

३. या प्रकरणी वाचा क्र. १, २ व ३ मधील अटीची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७११०७१६३२०८३००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd, serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2017.11.07 16:19:55 +05'30'

(गौरी रा.म्हस्के)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर.
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर.
३) प्र.स. (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.
४) सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. (३ प्रती)
६) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली.
७) विभागीय संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५ बी.जे.रोड,पुणे.
८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
१०) प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), नागपूर.
११) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर, जि. नागपूर.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) संचालक, लेखा व कोषागारे (संगणक विभाग), नविन प्रशासकीय भवन, मुंबई.
१४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१६) नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई ३२.
१७) वित्त विभाग (व्यय-२/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१८) अवर सचिव (२१-स/१७-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी (१६-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२ प्रती)
२१) चेअरमन, पूर्णा गारमेंट सहकारी संस्था मर्या., बसमत, जि. हिंगोली
२२) निवड नस्ती (टेक्स-२)